# योजनांची माहिती

## जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सोलापूर

कार्यकारी अभियंता हे या विभागाचे प्रमुख आहेत. या विभागाला केंद्रशासन, राज्यशासन व जिल्हा परिषद यांचेकडुन विविध योजनें अंतर्गत अनुदान प्राप्त हाते. सदर अनुदानातुन प्रामुख्याने सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याचे योजना करणे त्याची देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात.

तांत्रिक कामकाज उदा. सर्वेक्षण, आराखडा, अंदाजपत्रक तयार करणे, अंमलबजवणी, देखभाल व झालेल्या कामांचे मुल्यांकन ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत केली जाते.

मा.खासदार,मा.आमदार,स्थानिक लोक प्रतिनिधी,मा.पदाधिकारी, गटविकास अधिकारी, यांचे कडुन आलेल्या प्रस्तावाचे तांत्रिक छाननी करुन सक्षम प्राधिकरणांकडुन सर्वेक्षण मंजूरी घेऊन उपलब्ध अनुदानानुसार सदर प्रस्तावाची अंमलबजावणी केली जाते. ही कामे कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता यांचे पर्यवेक्षणाखाली पुर्ण केली जातात.खालील योजनांची प्रशासकिय मंजूरी ज्या त्या विभागामार्फत दिली जाते व त्याची अंमलबजावणी , व तांत्रिक मंजूरी देणे, कामे सुरु करणे व पुर्ण करण्यांची कार्यवाही ग्रामीण पाणी पुरवठा विभागा मार्फत केली जाते.

| अ.क्रं | योजनेचे नांव / लेखाशिर्षकाचे नांव | कोणत्या विभागामार्फत प्रशासकिय मान्यतेची कार्यवाही केली जाते |
|---|---|---|
| 1 | किमान गरजा कार्यक्रम | जिल्हा परिषद सोलापूर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग |
| 2 | विशेष घटक योजना | जिल्हा परिषद सोलापूर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग |
| 3 | नैसर्गिक आपत्ती अंतर्गत ता.न.पा.पु./न.पा.पु.योजना विशेष दुरुस्ती/टँकर व बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करणे.विंधन विहिर घेणे, खाजगी विहिर अधिग्रहण इत्यादी . | जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर . |
| 4 | आमदार खासदार स्थानिक विकास कार्यक्रम | जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर . |
| 5 | ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम | जिल्हा परिषद ग्रामपंचायत |
| 6 | उर्वरित वैधानिक विकास महामंडळ | जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर |
| 7 | दलितवस्ती सुधार योजना | जि.प.समाजकल्याण विभाग |
| 8 | शिक्षण विभागाकडील कामे | जि.प.शिक्षण विभाग |
| 9 | आरोग्य विभागाकडील कामे प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्र | जि.प.आरोग्य विभाग |
| 10 | पशुवैद्यकिय दवाखाने बांधणें व दुरुस्ती | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि.प.सोलापूर |
| 11 | अंगणवाडी इमारती बांधकामे | जि.प.महिला व बालकल्याण विभाग |
| 12 | रोजगार हमी योजना | जिल्हाधिकारी सोलापूर |
| 13 | केंद्रपुरस्कृत वर्धितवेग कार्यक्रम (ARWSP) | जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर |
| 14 | केंद्रपुरस्कृत वर्धितवेग कार्यक्रम (महाजल) | जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर |
| 15 | ग्रा.पा.पु.योजनांची देखभाल व दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान | जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर |
| 16 | अवर्षण प्रवणक्षेत्र विकास कार्यक्रम | जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर |
| 17 | देखभाल दुरुस्ती (जीएसडीए) | जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर |
| 18 | स्वजधारा कार्यक्रम | जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर |
| 19 | किमान गरजा कार्यक्रमअंतर्गत उपअभियान प्रकल्प | जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर |

## जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सोलापूर

## ग्रा.पा.पु विभागामध्ये विविध योजनांचे नियोजन व आराखडा तयार करण्यांची कार्यपध्दती

## योजना

### अ) केंद्र पुरस्कृत

1) केंद्रपुरस्कृत वर्धितवेग कार्यक्रमांतर्गत (ARWSP)

2) केंद्रपुरस्कृत वर्धितवेग कार्यक्रमांतर्गत (महाजल)

3) स्वजलधारा योजना

4) खासदार स्थानिक विकास कार्यक्रम

### ब) राज्य पुरस्कृत

1) जिल्हा वार्षिक योजनांतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे करणे किमान गरजा कार्यक्रम

2. विशेष घटक योजनांतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे करणे

3) आमदार स्थानिक विकास कार्यक्रम

4) ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना

5) उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ

### क) जिल्हा परिषद पुरस्कृत

1. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती

2. लघु नळ पाणी पुरवठा योजना राबविणे .

3. टी. सी. एल. पावडर खरेदी करणे.

4. श्री. क्षेत्र पंढरपूर व शिंगणापूर येथे येणाऱ्या यात्रेकरुकरीता पिण्याच्या पाण्याची सोय करणे.

5) ग्रामीण पाणी पुरवठा अंतर्गत हातपंप व विद्युतपंप देखभाल व दुरुस्ती करणे .

# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद सोलापूर

## प्रस्तावना

भारत देशामध्ये बहुतांश लोकसंख्या ग्रामीण भागात राहते ग्रामीण भागातील जनतेस स्वच्छ व शुध्द आरोग्यदायी पाणी पुरवठा करणे हा या विभागाचे मुख्य उद्देश आहे. शासनाच्या धोरणानुसार ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीस 40 लिटर पाणी दर दिवशी दर माणशी देण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा योजनांची आखणी व अंमलबजावणी केली जाते .तसेच शासनाने सन2001 या वर्षापासून मागणी आधारित लोकसहभागाचे धोरण स्वीकारले आहे. यामागे शासनाच्या ा ग्रामीण जनतेने पिण्य ाच्या पाण्याच्या व त्याअनुषंगाने आरोग्याच्या बाबीकडे गांर्भियाने लक्ष देण्याची व लोकांच्या सहाकार्याने प ाणी पुरवठा योजनांची कामे करून घेण्याच्या मानस आहे. मागील 10 वर्षापासून आपल्या राज्यामध्ये देशांच्या विविध भागामध्ये पावसाचे प्रमाण कमी झालेले आहे. भुजल पातळी ही अंत्यंत खाली गेलेली असल्य ाने उदभवाचे बळकटीकरण तसेच जलसंधारणाची कामे घेऊन भुजल पातळी मध्ये वाद होण्याचे दृष्टीने घेण्यात आलेली आहेत. ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांची कामे पारदर्शक पध्दतीने होणेचे दृष्टीने व कामाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने ग्राम सभेने ग्रामस्तरावर ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करून त्या समिती मार्फत कामे केली जातात.

## उद्देश

- या योजनेचा मुलभुत उद्देश हा ज्या खेडयाना पाणी पुरवठा योजना उपलब्ध नाही अशा खेडयांसाठी (वाड्य ा/वस्त्यासाठी) पिण्यासाठी स्वच्छ व शुध्द पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणे.

## योजनेचा निकष

- गावाची निवड शासन परिपत्रक पा.पु.व स्व.क्रं.ग्रापापु 1004/ प्रक्र-244/पापु-07 दि.18.01.2005 व शासन शुध्दीपत्रक,पा.पु.व स्व.वि.क्रं. ग्रापापु-1004/प्रक्रं/244/पापु-07 दि.8.02.2005 मधील मार्गदर्शक सुचनांनुसार खुल्या पध्दतीने व ग्रामसभेच्या सहमतीने अर्ज प्राप्त झाल्यावरच करावा.
- नवीन योजना देण्यापूर्वी गावाने जुनी योजना ,त्याची सर्व उपांगे ताब्यात घेतली आहेत. व त्याचा वापर होत आहे. याची खात्री करावी.
- गावाने सादर केलेला पर्याय किमान खर्चाचा आहे हे पहावे.
- प्रस्ताव सादर करताना जिल्हयाची आर्थिक तरतुद विचारात घेवून योजना मंजूर कराव्यात .
- ग्रामपंचायंतीकडून प्राप्त झालेल्या अंदातपत्रक व आराखडया (Plan & Estimates ) मध्ये मागितलेले शासन सहाय्य ठरवून दिलेल्या निकषानुसार आहे व त्यात अनावश्क जादा रक्कम वाढविलेली नाही. याची खात्री करून घेणे ,आता जिल्हापरिषदेला एका गावाच्या योजनांना प्रशासकीय

मंजुरी द्यावयाची नाही. कारण ती ग्रामसभा देणार आहे. ग्रामपंचायतीकडून प्राप्त प्रस्ताव तपासून त्याला आर्थिक निकषानुसार निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता द्यावयाची आहे.

योजना मंजूर करण्यापूर्वी अथवा सुरू असताना आवश्यकतेनुसार खात्री करण्यासाठी गावात जावून तपासणी करणे ,ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती , ग्राम सामाजिक लेखा परिक्षण समिती याचे बरोबर सभा घेणे किंवा आवश्यकतेनुसार ग्रामसभा बोलावून प्राप्त अहवालानुसार अथवा अन्यथा सर्व तरतुदीची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली याची खात्री करून घेणे.

**केंद्रशासन वेबसाईट**

या योजनेची केंद्र शासनाची जनतेकरिता स्वतंत्र वेबसाईट आहे या साईटचा पत्ता www.omms.nic.in असा आहे. या साईटवर जिल्हानिहाय संपूर्ण कामनिहाय माहिती उपलब्ध होऊ शकते.

**जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,सोलापूर**

## 2) वित्त आयोग

**अ)** केंद्र शांसनाच्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार पंचायत राज्य संस्थाना बळकटी करणांसाठी जिल्हा परिषदेला निधी उपलब्ध होतो. सदर निधीतुन जिल्हा परिषद स्तर, पंचायत समिती स्तर व ग्रामपंचायत स्तरावर शासनाकडील मार्गदर्शक सुचनाप्रमाणे मंजूर कामांची अंमलबजावणी ह्या विभागामार्फत करण्यांत येते.

### 1) जिल्हा परिषद स्तर

1. मोठ्या पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन व विस्तारीकरण
2. तिर्थक्षेत्राच्या ठिक्णी पाणी पुरवठा व स्वच्छता सोई सुविधा पुरविणे
3. प्राथमिक आरोग्य केंद्रात व रुग्णांसोबत येणा-या व्यक्तीसाठी पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून देणे.

### 2) पंचायत समिती स्तर

1. शाळामध्ये शुध्द पाण्याची व्यवस्था
2. दहन व दफनभुमी येथे विधंन विहीर घेणे.
3. अंगणवाडी येथे पाणी पुरवठा योजना राबविणे.
4. पशुवैद्यकिय दवाखाने येथे पाणी पुरवठा योजना राबविणे.

### 3) ग्रामपंचायत स्तर

1. पाणी पुरवठा योजना दुरुस्ती व देखभाल

## खासदार स्थानिक विकास कार्यक्रम

सदर योजनांतर्गत मा.खासदार यांचेकडुन त्यांच्या मतदार संघात विविध विकास कामे प्रशासकिय मंजूरी देण्यांसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे कामांची यादी प्रस्तावित करण्यांत येते.

मा.जिल्हाधिकारी यांचेकडुन प्रशासकिय मान्यता प्राप्त झालेल्या कामांची ह्या विभागा मार्फत अंमलबजावणी केली जाते.

सदर योजनेतुन खालीलप्रमाणे कामे अनुज्ञेय आहेत.

* पाणी पुरवठा योजना राबविणे.

## पाणी पुरवठा योजनांचे सर्व कामे

## 7) ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना

ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मुलभुत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने सदर योजनेची राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करण्यांत येते.

जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या सभेत शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रस्तावित तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यास "क" वर्ग तीर्थक्षेत्र अंतर्गत मंजूरी दिली जाते. जिल्हा स्तरावर जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानातुन "क" वर्ग मंजूर असणा-या तीर्थक्षेत्रांच्या विकास कामांना जि.प.स्तरावर मंजूरी दिली जाते.

तसेच राज्यस्तरीय तरतुदी अंतर्गत तीर्थक्षेत्र विकास कामांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडुन शासनांकडे सादर करण्यांत येते. शासनांकडुन निधी मंजुर झालेनंतर सदर कामांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेमार्फत केली जाते.

ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनांतर्गत खालील प्रकारची कामे घेण्यांत येतात.

* पाणी पुरवठा योजना

## 9) उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ

विविध ग्रामपंचायत स्तरावरील लोक प्रतिनिधीं, ग्रामपंचायत यांनी खाली अनुज्ञेय यादीतील कामांची मागणी या विभागाकडे केलेनंतर जागेचा दाखला,देखभाल दुरुस्ती हमीपत्र व अंदाजपत्रकांसह परिपुर्ण प्रस्ताव सदस्य सचिव उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ मुंबई यांचेकडे सादर केला जातो. प्रस्तावावर मंत्रालयीन प्रशासकिय विभाग व नियोजन विभागाकडुन निधी वितरीत झालेनंतर शासन निर्णय दि.15.7.08 नुसार कामांना प्रशासकिय मान्यता देणैत येते. पुढील कामांची अंमलबजावणी या विभागामार्फत करणैंत येते. या योजनेतुन खालीलकामे अनुज्ञेय आहेत. (शासन निर्णय क्रं.नियो/कार्या-3/उमवैविमं/विभागीय आयुक्त कार्यालय पुणे विधानभवन पुणे-1 दि.22.7.)

1. ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत मुनलिका/ विंधन विहीर/ नळाने पाणी पुरवठा